MHRT020003882018

<u>नियमित दिवाणी दावा क्र.११९/२०१८</u>

<u>निशाण क्र.६६ खालील आदेश</u>

**श्री.महादेव बाळकृष्ण मोरे**

**वि.**

**श्री.प्रमोद शंकर मोरे वगैरे ५**

मूळ वादी महादेव बाळकृष्ण मोरे यांचे वारस यांनी त्यांना अभिलेखावर घेण्याकरिता व त्यानुसार दाव्यात आवश्यक दुरुस्ती करण्याकरिता प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

२. वादीतर्फे वारस यांनी असे कथन करण्यात आले आहे की, सदर दावा मिळकतीबाबत ठराव व निरंतर ताकिदीसाठी दाखल करण्यात आलेला आहे. वादी महादेव बाळकृष्ण मोरे यांच्या वतीने त्यांच्या पत्नी लीला महादेव मोरे यांनी मुखत्यारपत्राच्या आधारे हा दावा दाखल केला होता. तथापि, मूळ वादी महादेव बाळकृष्ण मोरे यांचे दिनांक ०३/०७/२०२५ रोजी निधन झाले आहे. त्यामुळे त्यांच्या कायदेशीर वारसांना या दाव्यात पक्षकार म्हणून समाविष्ट करणे आवश्यक आहे.

३. अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे लीला महादेव मोरे, नितीन महादेव मोरे व गायत्री गुरुदास कदम हे मृत वादीचे कायदेशीर वारस असून, त्यांना दाव्यात पक्षकार म्हणून समाविष्ट करून त्यानुसार दाव्यात दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात यावी, अशी विनंती वादीतर्फे करण्यात आली आहे.

४. सदर अर्जास प्रतिवादीतर्फे हरकत दाखल करण्यात आली असून, अर्ज खोटा व खोडसाळ असल्याचे नमूद करून तो नामंजूर करण्याची विनंती करण्यात आली आहे.

**५.** दाव्याचे तसेच अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता, मूळ वादी महादेव बाळकृष्ण मोरे यांचा मृत्यू दाखला अभिलेखावर दाखल करण्यात आलेला असल्याचे दिसून येते. अर्जामध्ये नमूद केलेल्या व्यक्ती या मृत वादीचे कायदेशीर वारस नाहीत, असा कोणताही ठोस आक्षेप प्रतिवादीतर्फे घेण्यात आलेला नाही. तसेच सदर अर्ज हा कायदेशीर मुदतीत दाखल करण्यात आलेला आहे.

**६.** दाव्याचे स्वरूप विचारात घेता, मृत वादीचे कायदेशीर वारस अभिलेखावर येणे आवश्यक व न्यायोचित आहे. त्यामुळे सदर अर्ज मंजूर करणे उचित ठरेल. म्हणून मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करते :

## <u>आदेश</u>

१. वादी महादेव बाळकृष्ण मोरे यांचे कायदेशीर वारस अभिलेखावर घेण्यात यावेत.

२. त्यानुसार दाव्यात आवश्यक दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात येते.

३. दुरुस्ती केलेली प्रत पुढील तारखेस अभिलेखावर दाखल करण्यात यावी.

४. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

**(आदेश खुल्या न्यायालयात पारित व उद्घोषित करण्यात आला)**

GADE APARNA DAYANAND

Digitally signed by GADE APARNA DAYANAND
Date: 2026.08.06 14:50:28 +0530

**(अपर्णा डी.गाडे)**

**दिनांक – ०६/०८/२०२६** **सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रत्नागिरी.**